**CNRMHRG07000342020**

:: **रे.मु.नं.०१/२०२० मधील निशाणी क.२० वर आदेश** ::

**जनाबाई परशुराम म्हसकर ... *वादी***

***वि.***

***मोतीराम गोपाळ शेंडे ... प्रतिवादी***

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश १ नियम १० व आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात पक्षकार यांना सामील करुन जरुर त्या दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात वादीचे कथन की, सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीचे वाटप करुन मिळण्याकरिता, कुलअखत्यारपत्र रद्द करण्यासाठी, हक्कसोडपत्र रद्द करण्यासाठी, खरेदीखत वादीच्या हिश्यापुरते वादीवर बंधनकारक नाही असे ठरवुन मिळण्याकरिता व कायमच्या तसेच तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी दाखल करण्यात आला आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादीने दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी दावा मिळकत क्र.७, सर्वे नं.२८, हिस्सा नं.२ पैकी निम्मे क्षेत्र हे दिनांक १०/०८/२०२० रोजी नितीन अंबु कोंडीलकर यांना दस्त क्र. १२७८/२०२० अन्वये विक्री केली असल्याने त्यांना दाव्यात पक्षकार म्हणुन सामील करणे आवश्यक आहे. तसेच दावा मिळकतीचे मौजे आसल फेरफार नोंद क्र.१४८१ अन्वये दावा मिळकतीमध्ये सर्वे नंबरमध्ये बदल झालेला असल्याने दावा मिळकत 'अ' चे सर्वे नंबरमध्ये खालीप्रमाणे बदल झालेले आहेत.

| अ.क्र. | मिळकतीचे जुने वर्णन | मिळकतीचे नवीन वर्णन |
|---|---|---|
| १. | ४०/३ब | ३५/३ब |

| | | |
|---|---|---|
| २. | ३३/५ | १/५ |
| ३. | ३२/७ | ४०/७ |
| ४. | ५/१ब | १०/१ब |
| ५. | ११/२ब | ३/२ब |
| ६. | ११/३ | ३/३ |
| ७. | २८/२ | २४/२ |
| ८. | १०/२ | ४/२ |
| ९. | १९/५ब | १३/५ब |

३. वरील मिळकती या महसुली नवीन गाव आसलपाडा मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे वरील दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे कथन केले आहे.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, दाव्याचे कलम परिच्छे १४ नंतर १४अ ''दिनांक १० ऑगस्ट २०२० रोजीचे दावा मिळकत क्र.७ मधील निम्मा हिस्सा प्रतिवादी क्र.५ यांस हस्तांतरित केलेला आहे परंतु त्यास सदरील वादी हे पक्षकार नाही व सदरील वादी यास कोणताही मोबदला दिलेला नसल्याने ते खरेदीखत वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही'' हा मजकुर नमुद होणे आवश्यक आहे तसेच दावा कलम २५ड नंतर २५ड१ '' मौजे आसलपाडा सर्वे नंबर २८, हिस्सा नं.२ब व नवीन मौजे आसल, सर्वे नंबर २८, हिस्सा नं.२ या मिळकतीचा म्हणजेच दावा मिळकत क्र.७ चे दिनांक १०/०८/२०२० रोजीचा दस्त क्र.१२७८/२०२० अन्वये नोंदविललेला खरेदीचा दस्तऐवज या वादीच्या १/२ इतक्या अविभक्त सामाईक हिश्श्याकरिता वादीवर बंधनकारक नाही असे ठरवुन मिळावे '' त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन अनुशंगिक बाबी दाव्यात समाविष्ट करण्यास वादीस परवानगी मिळावी. वादीने अर्जाचे पुष्टयर्थ्य नि. क्र.२१ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले.

५. वादीने निशाणी क्र.२० कडील अर्जाचे पृष्ठर्थ दिनांक १०/०८/२०२० रोजीचे खरेदीखताच्या दस्ताची प्रमाणित प्रत, फेरफार क्र. १४८१ आणि फेरफार क्र.१४७७ दाखल केले आहेत. त्यामुळे सदरची

मिळकत दाव्यात समाविष्ट असणे गरजेचे आहे. कारण त्यामुळे दाव्याची पुनरावृत्ती टळणार आहे.

६. सदर अर्जास प्रतिवादीने नि.क्र.२४ वर म्हणणे देवून अर्जातील सर्व विधाने खोटी व खोडसाळ असुन ती त्यांना मान्य नसल्याचे कथन केले आहे. अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही, सदरचा अर्ज कायदयाने चालणारा नाही, पक्षकार सामील करुन मिळण्याकरिता स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक असताना वादीने दोन्हीं बाबींसाठी एकच अर्ज दाखल केलेला आहे सबब सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचे सक्षम कारण वादीने दिलेले नाही. वादीच्या मागण्या मान्य केल्यास दाव्याचे स्वरुपात बदल होण्याची शक्यता आहे, कायदयाने दाव्यातील दुरुस्तीने दाव्याचे स्वरुपामध्ये बदल होत असल्यास अशी दुरुस्ती मान्य करता येत नाही, तशी दुरुस्ती केल्यास प्रतिवादीचे पैशाने कधीही न भरुन येणरे अपरिमित नुकसान होईल, सबब वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

७. वादीचा अर्ज आणि प्रतिवादीचे सदरचे अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. वादीने त्याचे कथनाचे पृष्ठयर्थ कागदोपत्री पुरावा म्हणजेच दिनांक १०/०८/२०२० रोजीचे खरेदीखताच्या दस्ताची प्रमाणित प्रत, फेरफार क्र.१४८१ आणि फेरफार क्र. १४७७ दाखल केले आहेत.

८. दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ चे अवलोकन करता कोणताही पक्षकार योग्य अशी वादकथनामध्ये दुरुस्ती करु शकतो, ज्यामुळे दोन्ही पक्षकारांच्या दरम्यानचा वादाचा मुददा स्पष्ट होईल. या नियमाचे अवलोकन करता त्यामध्ये खालील शब्द नमूद आहेत.

> *“**वादकथनातील सुधारणा** – न्यायालयास, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास,*

***न्याय्य असेल अशा रितीने*** *व अशा अटीवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत ''*

९. वर नमूद केल्याप्रमाणे करण्यात येणारी दुरुस्ती ही योग्य असली पाहिजे. वरील सर्व परिस्थितीचा विचार करता व दाव्याचे स्वरुप विचारात घ ेता तसेच दावा मिळकतीशी निगडीत सर्व पक्षकार व मागण्या एकाच दाव्यात समाविष्ट असणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्याची पुनरावृत्ती टळणार आहे. दावा मिळकतीत त्रयस्थ इसमांचे हक्क प्रस्थापित झाल्याने सदर इसम हा दाव्यास आवश्यक पक्षकार झाला आहे. त्यामुळे दाव्यामध्ये दुरुस्ती करुन सदर इसमाचे नाव दाव्यात समाविष्ट करणे व त्याबाबतचा मजकूर दाव्यात समाविष्ट करण्याची परवागनी देणे न्यायोचित ठरेल. तसेच प्रस्तुत दाव्यामध्ये अदयापपावेतो वादीचा पुरावा सुरु झालेला नाही. सबब वादींच्या वरील सर्व बाबी विचारात घेवून वादींना दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायाचे ठरेल. कारणे आदेश.

**:: <u>आदेश</u> ::**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने अर्जातील नमुद केल्याप्रमाणे नितीन अंबु कोंडीलकर यांना दाव्यात प्रतिवादी क्र.४ म्हणुन समाष्टि करण्यात यावे तसेच दावा मिळकत अ मध्ये नमुद केलेले जुने सर्वे नंबर ऐवजी नवीन सर्वे समाविष्ट करण्याची अनुमती देण्यात येत आहे.

३. वादींनी दाव्यात विहित कालावधीत दुरूस्ती करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

कर्जत
दि.०२/०१/२०२३

**(सुजाता रा. शिंदे)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.